# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 10/09/2015 रोजी (का.प.क्र.6) (दि.07/08/2015 ची तहकूब सभा) संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

गुरूवार दिनांक 10 सप्टेंबर-2015 रोजी (दिनांक 07.08.2015 ची तहकूब अर्थसंकल्पीय सभा का.प.क्र .6) मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11:45 वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला अति.आयुक्त श्री.रमेश पवार,नगरसचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
03. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
04. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
05. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
06. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
07. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
08. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
09. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
10. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
11. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
12. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
13. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
14. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

श्री.मकरंद कुलकर्णी :स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांचे चुलते स्व.रामगोपाल बारवाल यांचे नुकतेच निधन झाले त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.रावसाहेब आमले :यास माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

(यावेळी स्व.रामगोपाल बारवाल यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

**<u>विषय क्रमांक 09 :-</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम कलम 95 अन्वये मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या सन 2015-2016 या वर्षीचे मुळ अंदाजपत्रकावर विचार विनिमय करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार मान्यता प्रदान करणे.

मा.सभापती :सन 2015-16 चे अंदाजपत्रक प्रशासनाने यापुर्वीच सादर केले होते त्यावर अभ्यास व इतर नवीन कामाकरीता तरतुद करण्या संदर्भात सभा तहकूब केली ती सभा घेत आहोत. सर्व स.सदस्य यांनी सन 2015-2016 च्या प्रशासनाने सादर केलेल्या जमा व खर्चाच्या अंदाजावर अभ्यास पुर्वक सर्वंकष चर्चा केलेली आहे. सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता,आपले शहर स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यामुळे शरात विकासाचे कामे मोठ्या प्रमाणावर होणार आहेच. तथापि

महापालिकेत नगरसेवक व सभापती म्हणुन पहिलाच कार्यकाळ असून माझ्या सोबत काही स.सदस्यांचा सुध्दा पहिलाच कार्यकाळ आहे व काही अनुभवी सदस्य सुध्दा या सभागृहामध्ये आहेत. या सर्वांच्या मार्गदर्शनानेच स्थायी समितीच्या वतीने सर्व स.सदस्यांना त्यांच्या प्रभागात विकासाचे कामे करण्यासाठी तरतुद उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याकरीता अर्थसंकल्पात भरीव अशी तरतुद करण्यात येणार आहे. प्रशासनाने सादर केलेल्या जमा बाजुच्या अंदाजामधील खालील बाबीमध्ये वाढ दर्शविण्यात येत आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 01. | स्थानिक संस्था कर | - | 225 कोटी ऐवजी | 250 कोटी | 25 कोटीची वाढ |
| 02. | मालमत्ता कर | - | 180 कोटी ऐवजी | 230 कोटी | 50 कोटीची वाढ |
| 03. | नगर रचना विभाग | - | 60 कोटी ऐवजी | 75 कोटी | 15 कोटीची वाढ |
| 04. | मनपाच्या मालमत्तेचे उत्पन्न | - | 06 कोटी ऐवजी | 10 कोटी | 04 कोटीची वाढ |
| 05. | इतर किरकोळ उत्पन्न | - | | | 16 कोटीची वाढ |

स्थानिक संस्था कर वसुलीमध्ये रहदारी वसुली नव्याने लागु करणे बाबत शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे,सदर वसुलीमध्ये वाढ दर्शविण्यात आलेली आहे. मालमत्ता कर वसुलीचे रिव्हीजन करुन व नविन मालमत्तांचा शोध युध्द पातळीवर करुन मालमत्ता कर वाढविण्याचे आदेशित करण्यात येत आहे. तसेच शहरात मोठमोठे अपार्टमेंटला व बांधकाम परवानगी दिलेल्या शहरातील सर्व मालमत्तांना कंम्प्लीशन प्रमाणपत्र घेण्यासाठी प्रवृत्त करुन त्यामधुन मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त करण्याचे नगर रचना विभागांना आदेशित करण्यात येत आहे. मनपाच्या शहरात असलेल्या मोक्याच्या जागी टी.व्ही.सेंटर येथे जसे शॉपींग कॉम्प्लेक्स उभारण्यासारखे प्रकल्प हाती घेण्याचा मानस आहे. यामधुन अतिरिक्त उत्पन्न गृहीत धरण्यात आलेले आहे.

तसेच प्रशासनाने सादर केलेल्या खर्चाच्या अंदाजमध्ये स्पील ओव्हरच्या कामांमध्ये काही कामे मागील 2 ते 3 वर्षांपासुन सतत यादीमध्ये समाविष्ट असल्याचे निदर्शनास येत आहेत. प्रशासनाने सदर कामांचा आढावा घेऊन जी कामे होऊच शकत नाही किंवा जी कामे अनावश्यक आहे, अशा सर्व कामांची वॉर्डनिहाय यादी तयार करुन पुढील स्थायी समितीच्या बैठकीत विचारार्थ सादर करावी, त्याबद्दल योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

प्रशासनाने सादर केलेले एकुण उत्पन्न रु.783.86 कोटी मध्ये रु.110.00 कोटी वाढ करुन रु.893.86 कोटीचे जमा व रु.893.76 कोटी खर्चाचे व रु.10.00 लक्ष शिलकीचे अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 100 नुसार अंतिम मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेसमोर पाठविण्यास शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.गजानन बारवाल :अतिशय मोठी जबाबदारी आपणांवर होती चांगला अर्थसंकल्प सादर केला ज्या ज्या सुचना सुचविल्या त्याची अमलबजावणी व्हावी. 5 महिण्याचा कालावधी गेला उर्वरीत कालावधीत सर्व कामाचे अंदाजपत्रक तयार करणे टेंडर काढणे सर्व करावे अनेक कामे आवश्यक असतांना काही कारणास्तव होत नाही. स्पील ओव्हरचे कामे

वाढली हि कामे बाजूला करून नवीन कामे घेणे आवश्यक आहे आवश्यक आहे ते करावे स्थानिक संस्था करामध्ये कमी वाढ केली. जो पर्यंत पैसे येत नाही. तोवर पुढील वाटचाल होणार नाही विकास कामास अडचणी येताते. लाईट बंद टेंडर होऊन काम होत नाही. याकडे लक्ष दयावे मालमत्ता करात वाढ करावी जास्त वसुली करावी. शहरात मोठया प्रमाणात इमारती कम्प्लीशन देऊन उत्पन्न वाढावे. मालमत्ताचे उत्पन्न मोठे यायला पाहिजे. मनपाच्या अनेक वास्तु पडून आहे. 10 कोटी पेक्षा जास्त वसुली येईल मोक्याच्या जागा विकासीत कराव्या इतर किरकोळ अनेक उत्पन्न येऊ शकेल. वसुल करावे. जास्तीत जास्त बजेट या समितीच्या सदस्याच्या वार्डात दयावे हे आपल्या हातून होते याचा आम्हाला सार्थक अभिमान आहे.

श्री.गजानन मनगटे :893 कोटी बजेट केले. यात वाढ होणार आहे शहरामध्ये मोफत अंत्यविधी योजना लागू केली दोन अडीच कोटी खर्च येत असे एवढे मोठे बजेट असतांना ती योजना बंद केली. या योजनासाठी बजेट ठेवावे.

मा.सभापती :हा सर्व समावेशक निर्णय घेणे आवश्यक असल्याने यासाठी स.पदाधिकारी यांचेशी चर्चा झाल्यानंतर सर्वसाधारण सभेत तरतूद करू शकतो. सर्व धर्मीयांचा त्यात समावेश करणे आवश्यक आहे.

श्री.गजानन बारवाल :जो निर्णय या बैठकीत घेतला त्यात बदत होऊ नये.

श्री.अब्दुल नाईकवाडी :1990 च्या नंतर मालमत्ताचा सर्वेच नाही. जुनाच टॅक्स येतो नवीन घरे कॉलनी होत आहे. 230 टारगेट दिले. स्मार्ट सिटी होत आहे त्याप्रमाणे बजेट असावे वाढ करावी.स्थानिक संस्था करामध्ये वाढ करावी तसे शासनास कळवावे. टावर्स 5000 इलिगल योग्य कार्यवाही करावी त्यातून उत्पन्न येईल नगररचना विभागाचे टारगेट आणखी वाढवून दयावे. या समितीच्या सदस्यांच्या वार्डात वाढीव निधी देण्यात यावा.

मा.सभापती :भरीव तरतूद केली जे उद्दीष्ठ ठेवले त्यापेक्षा जास्त मिळू शकते. एलबीच्या बाबतीत मागिल तीन वर्षाचे एवरेज ग्राहय धरून शासनाकडे मागणी केली यापेक्षा जास्त मिळणे अपेक्षीत नाही.व्यापा-याकडील थकबाकी व येणारे उत्पन्न यावर एवरेज नुसार शासन अनुदान देईल.

श्री.गजानन बारवाल :गुंठेवारी विभाग सक्षम करावा तेथून पैसे आले तर काम करता येईल. तेथे काम कसे करता येईल विचार करावा.

श्री.अब्दुल नाईकवाडी :118 गुंठेवारी वसाहत आहे गुंठेवारी विभागात योग्य पध्दतीने काम होत नाही. तेथील सर्वे होत नाही. विविध कारण दाखवून संचिका नामंजूर होते.येथील घरे रेग्यूलर केले सर्वे केला तर टॅक्स वाढेल नल कनेक्शन लिगल करावे 100 कोटी सर्व उत्पन्न येऊ शकते जनतेमध्ये जनजागृती करावी गुंठेवारी भागात रस्त्यावर मोठे खड्डे असतांना निधी खर्च करीत नाही आमदार निधी वापरू देत नाही या विभागाने नियोजनबध्द काम करावे शकतील. 2001 पासून या भागात विकास कामे होत नाही नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

मा.सभापती :गुंठेवारी भागात विकास कामे होण्यासाठी व नियमीत करण्यासाठी कार्यवाही करावी.

श्रीमती समीन शेख :टेलीकॉम कंपनीने रस्ते खोदल्याची परवानगी दिल्यानंतर तेथील काम केले नाही त्यामूळे दुरूस्तीसाठी मनपास 2.07 कोटी लागणार वृत्तपत्रात आले हे खरे आहे का? खोदकाम केल्यानंतर कुणी काम करायचे होते.

कार्य.अभियंता(ई व फ) :कंपनीकडून जे चार्जेस घेतले होते त्यातून टेंडर काढून जे कामे राहिलेली आहे ती स्पील ओव्हर मधुन सुरू करणार आहोत.

मा.सभापती :जे डिपॉजीट केले होते त्यातून टेंडर काढले भविष्यात ती सर्व कामे होणार आहे.

श्री.गजानन बारवाल :विविध कंपन्याकडून पैसे घेतो परंतु रस्त्याची,नळ दुरूस्तीची कामे खड्डे होतात बुजवले जात नाही. दखल घेतली जावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :कंपनीकडून पैसे घेतले असेल परंतु त्यातून काम करणे मनपाची जबाबदारी असते. अशी कामे लवकर करावी.

मा.सभापती :अशी कामे त्वरीत टेंडर काढून करावे.

श्री.विकास एडके :या बजेटमधून किती विकास कामे होणार आहे यापुर्वी किती कामे झाली. स्पील ओव्हर आलेले आहे. विकास कामासाठी किती तरतूद आहे खरे काम किती रक्कमेचे होणार तातडीने मंजूरी देऊन अंदापत्रक तयार व्हावे व विकास कामे करण्याची अंमलबजावणी व्हावी. एक सदस्यांच्या वार्डात 1 कोटी पर्यत तरतूद दयावी.

मा.सभापती :भावना रास्त आहे. कामाची यादी बजेट मध्ये घेणार आहोत अशी सर्व कामे त्यास प्रशासनाने लगेच मान्यता देऊन अंदाजपत्रक तयार करून वर्कऑर्डर देऊन कार्यवाही करावी.

श्री.विकास एडके :यात स्पील ओव्हरची जास्त कामे कारण काय ?

मा.सभापती :कामे केली नाही म्हणून बजेटमध्ये आली. यासाठी योग्य पर्याय शोधले जातील.

**ठराव :**

प्रशासनाने सादर केलेल्या जमा व खर्चाच्या मुळ अंदाजावर सर्व सन्माननिय सदस्य यांनी सर्वकष अभ्यास करून चर्चा केली सर्व सदस्यांचा भावना लक्षात घेता आपले शहर स्मार्ट सिटी च्या दिशेने वाटचाल करित आहे. त्यामुळे शहरात मोठया प्रमाणवर विकासाची कामे होणार आहे तथापि सर्व स.सदस्य यांच्या भावना लक्षात घेता त्यांच्या प्रभागात देखभाल दुरूस्ती व विकासाची कामे करण्यासाठी तरतुद उपलब्ध करून देण्यासाठी जमा बाजुच्या अंदाजा मध्ये वाढ सुचविण्यात येऊन देखभाल दुरूस्ती व विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.

स्मार्ट सिटी मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कराची वसुली ची टक्केवारी 80% होणे आवश्यक आहे.या साठी शहरातील नव्या मालमत्तेचा शोध घेणे मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये सुसुत्रता यावी व प्रभावीपणे वसुली करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागातील कार्यरत कर्मचा-यांचा आढावा घेऊन अनावश्यक कर्मचा-यापैकी या दोन्ही विभागासाठी 25% वाढीव व आवश्यक कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन द्यावा.

मालमत्ता कराचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे, त्यामुळे मालमत्ता धारकांना डिमांड नोटीसही बजावण्यात आलेल्या आहेत. मालमत्ता कर वसुली उद्दिष्टानुसार करण्याचा प्रयत्न प्रशासनाने करावा.

गरीबाभिमुख (प्रोपुअर बजेट) झोपडपटटी विकास कार्यक्रम, दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्यांक बहुल वसाहतींमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासन निर्देशानुसार तरतुद करण्यात आली आहे. सदरील तरतुद सहा प्रभागात समान विभागणी करण्यात येते. दिनांक 30 नोव्हेंबर-2015 पर्यंत मा.आयुक्तांनी सदरील तरतुदी मधुन हाती घ्यावयाच्या कामांचे नियोजन करुन सन्माननिय पदाधिकाऱ्यांना अवगत करावे.

अंदाजपत्रकामधील अनावश्यक स्पिल ओव्हर कामे जी की गेल्या काही वर्षापासुन सतत अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट होत आहे अश्या कामांची आवश्यकता नसल्यास अश्या सर्व कामांची सविस्तर यादी करून स्थायी समिती समोर ठेवुन स्थायी समितीची मान्यता घेऊन अशी कामे वगळून टाकावी.

प्रशासनाने नवीन ड्रेनेज लाईन व घनकचरा व्यवस्थापन मशीनरी खरेदी संदर्भात आवश्यक तरतुद करणे संदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे तथापि स्थायी समितीने वाढीव तरतुदीमधुन सर्व स.सदस्य यांच्या प्रभागात विकास कामांना तरतुद वाटप केलेली असल्यामुळे सर्वसाधारण सभेने या वर योग्य निर्णय घेऊन तरतुद करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

प्रशासना तर्फे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 अन्वये सन 2014-15 चे सुधारीत अर्थसंकल्पिय जमा रू.447 कोटी 85 लक्ष 50 हजार या मध्ये प्रारंभीची शिल्लक 22 कोटी 63 लक्ष 24 हजार असे एकुण 470 कोटी 48 लक्ष 74 हजार व खर्च रु. 470 कोटी 39 लक्ष 00 हजार विचारात घेऊन रु.18 लक्ष 74 हजार शिलकीच्या सुधारित अर्थसंकल्पास स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 143 दिनांक 16.03.2015 अन्वये तसेच दिनांक 01 एप्रिल 2015 ते 31 जुलै 2015 पर्यन्त लेखानुदानास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

उपरोक्तनुसार प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये फेर फार, दुरुस्ती व वाढ करुन सन 2015-16 करीता महानगरपालिकेचे मुळ अंदाजपत्रक जमा रु.859 कोटी 02 लक्ष 00 हजार या मध्ये प्रारंभीची शिल्लक 24 लक्ष 84 हजार असे एकुण 883 कोटी 86 लक्ष 27 हजार जमा व खर्च रु. 883 कोटी 82 लक्ष 80 हजार विचारात घेऊन रु.03 लक्ष 49 हजार शिलकीच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2014-2015 चे सुधारित व सन 2015-2016 चे मुळ अर्थसंकल्प महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 100 अन्वये अतिम मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर अंतिम मान्यतेस्तव सादर करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद